ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ५ ऑक्टोबर, १९५५ | अंक ४०

## विविध माहिती

**इस्पितळाला देणगी**—जबलपूर येथील औषधांचे व्यापारी श्री. श्यामसुंदर आगरवाल ह्यांनीं व्हिक्टोरिआ इस्पितळाला ६,००१ रुपयांची देणगी दिली आहे. आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यांत आलेल्या ह्या रकमेचा उपयोग शरीराच्या अंतर्गत भागांचे फोटो घेण्याची सोय करण्याकडे करावा, अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली आहे. ह्या खात्यासाठी स्वतंत्र इमारतच बांधण्यांत येणार आहे.

**गिर्यारोहणाला उत्तेजन**—लंडन येथील माऊंट एव्हरेस्ट फौंडेशननें भारत व पाकिस्तान ह्या दोन देशांना ३,३४० रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. दोन्ही देशांत गिर्यारोहणाच्या प्रयत्नांना उत्तेजन मिळावें म्हणून ह्या देणग्या देण्यांत आल्या आहेत. देणग्यांच्या रकमा उभयता देशांतील गिर्यारोहणविषयक संस्थांना वाटून दिल्या जातील.

**नेपाळमध्यें जाणाऱ्या विमानांची सोय**—नेपाळमध्यें विमानांना उतरण्यासारख्या सोयी करण्यासाठी भारतीय विमान-दलाचे तपासनीस गेले आहेत. नेपाळमध्यें सध्यां खाटमांडू आणि विराटनगर ह्या दोन शहरांखेरीज विमानें उतरण्या–चढण्याच्या इतर ठिकाणीं सोयी नाहींत. कांहीं दिवसांपूर्वी अशा सोयींच्या अभावीं दोन भारतीय विमानांना अपघात झालेला आहे. ह्यासंबंधीची प्राथमिक पहाणी तपासनीस करीत आहेत.

**त्रावणकोर कोचीनमधील बँकिंग**—त्रावणकोर–कोचीन राज्यांतील बँकिंगच्या व्यवसायाची चौकशी करण्यासाठी भारतीय सरकार कमिशन नेमणार आहे. ही घोषणा करतांना मध्यवर्ती सरकारचे मजूर मंत्री श्री. खंडुभाई देसाई म्हणाले कीं त्रावणकोर–कोचीन राज्यांत वाजवीपेक्षा अधिक बँका झाल्या असून बऱ्याच छोट्या बँकांचें एकीकरण करावें लागेल, असें दिसतें.

**पुलासाठी मध्यवर्ती सरकारची मदत**—बनारस ते कन्याकुमारी ह्या रस्त्यावर मदुरेनजीकच्या एका नदीवर पूल बांधण्याची आवश्यकता आहे. ह्या पुलाच्या खर्चासाठी भारतीय सरकारनें ७·३८ लाख रुपयांची मदत मंजूर केली आहे. खर्चाची सर्व रक्कम भारतीय सरकारच देत आहे. कारण, हा अखिल भारतीय स्वरूपाचा रस्ता आहे.

**ब्रिटनमध्यें 'कृष्ण टॉकीज'**—ब्रिटनमध्यें ब्रॉमविच ह्या गांवीं भारतीयांसाठीं एक सिनेमागृह उघडण्यांत आलें आहे. प्रयोगादाखल तें तीन महिने चालविण्यांत येईल. त्याचें नांव 'कृष्ण टॉकिज' असें ठेवण्यांत आलें आहे.

**हुंड्याला मनाई करणारें बिल**—आंध्र विधिमंडळांत हुंडा देण्यास व घेण्यास प्रतिबंध करणारें बिल मांडण्यांत आलें आहे. हुंडा देण्या-घेण्याच्या करारांनाहि अशीच बंदी करण्यांत आली आहे. अशा प्रकारचा करार केल्यास तो मुळांतच बेकायदा ठरविला गेला असून कराराच्या आधारानें कोर्टांतहि जातां येणार नाहीं, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

**माकडांवरील आयात-कर**—भारतामधून अमेरिकेला पाठविण्यांत येणाऱ्या माकडांच्या किंमतीवर ७॥ टक्के आयातकर घेतला जातो. पोलिओ रोगप्रतिबंधक लस तयार करण्याच्या कामीं माकडांवर संशोधन करण्यांत येत असल्यानें हा आयात-कर अमेरिका कमी करण्याचा विचार करीत आहे. जागतिक व्यापार वाढावा म्हणून आणखीहि कांहीं पदार्थांवरील आयात-कर कमी करण्याचा तिचा विचार चालू आहे.

**पुरून ठेवलेलें धन मिळालें**—भारताची फाळणी झाल्याच्या वेळीं पेशावरमधील दोन शीख आपलें रहातें घर सोडून भारतांत आले होते. पाकिस्तान सरकारच्या परवानगीनें भारतीय अधिकाऱ्यांच्या समवेत त्यांना पूर्वीच्या घरीं जाऊं देण्यांत आलें. तेव्हां त्यांनीं घरांतील एका खोलींत पुरलेलें ३०,००० रुपये किंमतीचें सोनें–चांदी बाहेर काढलें. त्याशिवाय कांहीं दागिने व इतरहि कांहीं माल त्यांना मिळाला.

**दिल्ली शहरांतील वाढत्या आत्महत्त्या**—१९४७ सालापासून दिल्ली शहरांत आत्महत्त्या करणाऱ्या लोकांची संख्या वाढूं लागल्याचें दिसतें. १९४७ पासूनच्या पुढील वर्षांचे आंकडे १९, २८, ३९, ३१, ७२, व ७५ असे आहेत. चालू सालांत सप्टेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत ४६ लोकांनीं आत्महत्त्या केल्या. घरगुती भांडणें, प्रेमप्रकरण, परीक्षेंतील अपयश, गरिबी व बेकारी अशीं कारणें आत्महत्त्येच्या मुळाशीं आढळून येतात.

**भारतामधील साखरेचें उत्पादन**—ऑक्टोबरअखेर भारतामधील साखरेच्या उत्पादनाचा हंगाम संपतो. ह्या हंगामांत साखरकारखान्यांनीं १५.८६ लाख टन साखर तयार करून नवा उच्चांक गांठला आहे. १९५३–५४ सालांतील हंगामापेक्षा हें उत्पादन ५·८६ लाख टनांनीं अधिक आहे. ह्यापूर्वी १९५१–५२ सालीं झालेल्या जास्तींत जास्त उत्पादनापेक्षा चालू हंगामाचा आंकडा ८७,००० टन अधिक आहे.

**ऑस्ट्रेलिआ आयात कमी करणार**—ऑस्ट्रेलिआच्या सरकारनें आपल्या आयातींत ६·४ कोटी पौंड किंमतीच्या मालाची कपात करण्याचें ठरविलें आहे. चलनवृद्धीचा धोका कमी करण्यासाठी हा एक उपाय योजण्यांत येत आहे.

## सुखी जीवननी पगदंडी

लेखकः—श्री. श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
अनुवादकः—प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.,

( प्रकाशक-सस्तुं साहित्यवर्धक कार्यालय, भद्रपासे, अहमदाबाद. पृष्ठें १६७. किंमत १-८-० )

पुणें येथील अर्थ या साप्ताहिकाचे संपादक श्री. श्री. वा. काळे, यांनीं लिहिलेलें कण आणि क्षण हें कौटुंबिक जीवनांतील समस्यांवर खेळकर शैलीनें लिहिलेलें पुस्तक मराठी भाषेच्या वाचकांना सुपरिचित आहेच. श्री. ना. ह. आपटे यांनीं यापूर्वी लिहिलेल्या गृहसौख्य वगैरे कौटुंबिक जीवनावरलि ग्रंथांप्रमाणें या ग्रंथालाहि लोकमान्यता मिळाली आहे. याच पुस्तकाचा गुजराती भाषेंत अनुवाद करून प्रा. शशिन् ओझा यांनीं आंतरभारतीच्या ध्येयास पोषक असें महत्त्वाचें कार्य केलें आहे. प्रा. शशिन् ओझा यांचीं इतर गुजराती पुस्तकें पूर्वींच वाचकांच्या मान्यतेस उतरलीं असून प्रस्तुत अनुवाद त्यांच्या लौकिकास साजेल असाच उतरला आहे. त्यांची ओघवती व घरगुती गुजराती भाषा वाचीत असतां, ती मराठीचा मागोवा घेत पुढें चालली आहे, असें गुजराती वाचकाला वाटणारहि नाहीं इतकी सहजता त्यांच्या अनुवादांत उतरली आहे. प्रा. ओझा यांनीं मराठींतील श्रेष्ठ ललितकृतींचेहि असेच अनुवाद करून त्यांचा गुजराती भाषिकांना परिचय करून दिल्यास तें एक चांगलें सांस्कृतिक कार्य होईल.

प्रा. मा. म. गोरे

( फर्गसन् कॉलेज मॅगेझिन, सप्टेंबर, १९५५ )

---

### विम्याच्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण अयोग्य

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेनें भारतीय सरकारच्या अर्थखात्याला एक परिपत्रक धाडून विम्याच्या धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध मत व्यक्त केलें आहे. पत्रकांत असें म्हटलें आहे. कीं, राष्ट्रीयीकरण करण्यास योग्य अशीं कारणें तर नाहींतच, पण शिवाय सरकारनें स्वीकृत केलेल्या धोरणाशींहि राष्ट्रीयीकरणाची कल्पना विसंगत आहे. विम्याच्या धंद्याचा विचार सरकारनें वास्तववादी दृष्टीनें करावा; केवळ तात्त्विक भूमिकेवरून त्याच्याकडे पाहूं नये. सध्यां भारताची अर्थव्यवस्था विस्ताराच्या अवस्थेंत आहे. अशा अर्थव्यवस्थेच्या गरजा भागवूं शकेल अशा पद्धतीनें विम्याचा व्यवसाय करतां आला पाहिजे. परंतु हें साध्य होण्यासाठीं कायम अशा स्वरूपाचे नियम घालून देणें शक्य होणार नाहीं. कारण, विमा-व्यवसायांत वेळोवेळीं करावे लागणारे बदल स्वतंत्र वातावरणांतच झटपट करणें शक्य होईल. सरकारनें विम्याचा कारभार हातीं घेतल्यास तो कितीहि दक्षतेनें वा कार्यकुशलतेनें चालविण्यांत आला तरी, त्यांत जरूर तो लवचिकपणा अगर तारतम्य वापरण्याचें स्वातंत्र्य रहाणार नाहीं. सरकारला ह्या क्षेत्रांत पदार्पण करावयाचेंच असेल तर किती तरी वाव अजून शिल्लक आहे. उदाहरणार्थ, सरकारला पोस्टांत उतरण्यांत येणाऱ्या विम्याची व्याप्ति वाढवितां येईल अगर सरकारतर्फे उतरण्यांत येणाऱ्या विम्याचा कारभार यशस्वी करून दाखवितां येईल. गेल्या कांहीं महिन्यांत सरकारतर्फे विम्याच्या धंद्यासंबंधीं जीं मतें व्यक्त करण्यांत आलीं, त्यामुळें विमाव्यवसायांत संशयाचें व अनिश्चिततेचें वातावरण पसरलें आहे. विम्याचे करार दीर्घ मुदतीचे असल्यामुळें असें वातावरण व्यवसाय बाधक होईल.

## इं. फि. कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जें

### मुंबई राज्याचा वाटा

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ३०-६-१९५५ अखेर संपलेल्या वर्षीं एकूण २७ कंपन्यांना मिळून ७,३४,००,००० रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं. ह्यापैकी १८ कंपन्या नवीन होत्या ( म्हणजे, त्यांचें उत्पादन १५ ऑगस्ट १९४७ नंतर सुरू झालें ) व त्यांना ५,५२,५०,००० रु. चीं कर्जें मंजूर झालीं. ९ कंपन्या त्यापूर्वींपासून उत्पादन करीत होत्या; त्यांना १,८१,५०,००० रु. कर्ज मंजूर झालें. कर्ज मंजूर झालेल्या मुंबई राज्यांतील उद्योगधंद्यांचा तपशील येथें दिला आहे:—

( १ ) नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. ( कल्याण, ठाणें ) ५५,००,००० रु. आणखी दिले. २० स्पिनिंग फ्रेम्स बसवून उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी.

( २ ) कोपरगांव सहकारी साखरकारखाना लि. ( कोपरगांव, अहमदनगर ) ४०,००,००० रु. ८००/१०० टनांचा नवा कारखाना कोपरगांव येथें उभारण्यासाठी.

( ३ ) उगार शुगर वर्क्स लि. ( उगार खुर्द, बेळगांव ) ला २९,००,००० रु. दिले. उत्पादनशक्ति ५०० टनांची ८०० टन करण्यासाठी.

( ४ ) प्रवरा कनाल सहकारी कारखाना लि. ( लोणी ) ३६,००,००० रु. आणखी दिले. १०००/१२०० टनांची नवी यंत्रसामुग्री बसविण्यासाठी.

( ५ ) राहुरी सहकारी साखरकारखाना लि. ( देवळाली प्रवरा, राहुरी ) ४३,००,००० रु. ८००/१०० टनांच्या साखरकारखान्यासाठी.

( ६ ) नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. ला आणखी ५,००,००० रु. जादा भांडवली खर्च भागविण्यासाठी.

( ७ ) दि ऑटोमोबाइल प्रॉडक्टस ऑफ इंडिया लि. ( भांडुप, मुंबई ) १२,५०,००० रु. मोल्डेड वायर वॅक्ड ब्रेक लाइनिंगजच्या उत्पादनाची यंत्रसामुग्री बसविण्यासाठी.

( ८ ) जे. के. केमिकल्स लि. ( वडाळा, मुंबई ) ३५,००,००० रु. रसायनांचें उत्पादन हातीं घेण्यासाठी भांडवली खर्च.

( ९ ) वेस्ट कोस्ट पेपर मिल्स लि. ( दांडेली, उ. कानडा ). १,००,००,००० रु. वार्षिक १५,००० टन उत्पादनशक्तीची गिरणी काढण्यासाठी.

---

**भारत सरकारला नोटीस**—गोध्रा येथील एका मोटार ड्रायव्हरनें भारत-सरकारवर आपली पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज खात्यांतील १०० रुपयांची रक्कम मिळण्याबद्दल नोटीस बजावली आहे. उत्तर गुजरातमधील कोठियामधील पोस्ट ऑफिसांत आपण वरील रक्कम १९४८ सालीं ठेवली. त्यानंतर सदर रक्कम गोध्रा येथील पोस्ट ऑफिसांत वर्ग करण्यासाठी गोध्रा ऑफिसांत आपण पास बुक दिलें. पण अद्याप आपणाला रक्कम अगर त्याचा हिशोब कांहींच मिळाले नाहीं, अशी तक्रार आहे.

**नाट्याचा डिप्लोमा**—अन्नमलाई विद्यापीठानें नाट्यविषयासंबंधी शिक्षणाचा कोर्स ठेवण्याचें ठरविलें आहे. ह्या शिक्षणक्रमाचा अभ्यासक्रम आणि परीक्षाविषयक नियमहि ॲकॅडेमिक कौंसिलनें मंजूर केले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना डिप्लोमा देण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑक्टोबर, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतामधील दंतरोगांचा अभ्यास

जागतिक आरोग्य-संघटनेचे दातांच्या आरोग्याबद्दलचे सल्लागार, डॉ. नटसन, हे सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहेत. भारतामधील दंतरोगांचा अभ्यास करून त्याबद्दल जागतिक संघटनेला अहवाल सादर करण्याचा त्यांचा हेतु आहे. दातासंबंधींच्या रोगांचा प्रसार थांबविण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेला तांत्रिक व इतर मदत देण्यास ह्या अहवालाचा उपयोग होणार आहे. डॉ. नटसन ह्या कामासाठी भारतांत १५ दिवस हिंडणार आहेत. मद्रासमधील वैद्यकीय संस्था व मद्रास मेडिकल कॉलेजला जोडलेलें दातांचें कॉलेज ह्या संस्थांना त्यांनीं भेटी दिल्या. दातांच्या कॉलेजमध्यें चाललेल्या कामाबद्दल त्यांचा चांगला ग्रह झाला. भारतामधील आपल्या दौऱ्याविषयीं बोलतांना डॉ. नटसन म्हणाले, कीं मी आतांपर्यंत नवी दिल्ली, मुंबई व इतर कांहीं शहरांना गेलों आहें. दौऱ्यांत केलेल्या अवलोकनावरून माझें असें मत झालें आहे, कीं भारतांत युरोपिअन देशांच्या मानानें दंतरोगांचें प्रमाण बरेंच कमी आहे. यांतहि शहरापेक्षा खेडेगांवांत दातांच्या रोगाचें प्रमाण फारच कमी असल्याचें आढळून आलें. दातांच्या रोगांचा प्रसार थांबविण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना काय करूं शकेल असा प्रश्न विचारण्यांत आला असतां डॉ. नटसन म्हणाले, कीं भारतांमधील बरेच डॉक्टर्स सध्यां अमेरिकेंत दंतवैद्यकीचा अभ्यास करीत आहेत. ह्या ज्ञानक्षेत्रांतील आधुनिक माहिती ते मिळवीत आहेत. भारतामधील दंतवैद्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणें, अमेरिकेंत जाऊन शिकण्या-साठीं फेलोशिप्स देणें, दातांचें रक्षण करण्यासाठी व दातांचे रोग बरे करण्यासाठी जी जी माहिती पाश्चात्य देशांत उपलब्ध होईल ती ती त्यांना पुरविणें, ह्या प्रकारची मदत आरोग्य-संघटनेकडून भारताला मिळूं शकेल.

## पवनचक्क्या तयार करण्याचा कारखाना

भारतांत मोठमोठीं धरणें बांधून त्यांच्यावर जलविद्युत् निर्माण करण्याचे प्रयत्न अनेक ठिकाणीं होत आहेतच. अशा प्रकारच्या मोठ्या वीज-निर्मिति केंद्रांना पवनचक्क्यांवर उत्पन्न होऊं शकणाऱ्या विजेचीहि जोड देतां येण्यासारखी आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. पवनचक्क्यांचा उपयोग करून छोट्या प्रमाणावर असणाऱ्या शेतीला पाण्याचा पुरवठा करतां येतो आणि लहान वस्तीच्या खेड्यांना वीजहि पुरवितां येते. आतांपर्यंत भारतांत असे प्रयत्न फक्त प्रयोगात्मकच झालेले आहेत. तथापि, वाऱ्याच्या प्रवाहाच्या शक्तीचा उपयोग करून घेण्याच्या विस्तृत योजना आतां आंखण्यांत येत आहेत. वाऱ्याच्या गतीचा उपयोग करून पवनचक्क्या चालण्यासारखी अनुकूल परिस्थिति भारतांत बऱ्याच राज्यांत आहे. सौराष्ट्र, राजस्थान, मुंबई, मद्रास, त्रावणकोर-कोचीन, ह्या राज्यांतून बऱ्याच ठिकाणीं पवनचक्क्यांचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. आंध्र व ओरिसा राज्यांच्या किनाऱ्यांवरील भागांतहि पवनचक्क्या चालतील. त्याशिवाय इतर कोणकोणत्या भागांत त्यांचा उपयोग करून घेतां येईल ह्यासंबंधीं पहाणी करण्याचें कार्यहि चालू झालें आहे. हॉलंड-सारख्या देशांतून पवनचक्क्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतो हें प्रसिद्धच आहे. भारतामधील एका कंपनीनें कलकत्ता येथें पवनचक्क्या तयार करण्याचा कारखाना काढण्याची योजना भारतीय सरकारला सादर केली असून ती सरकारनें मान्यहि केली आहे, असें समजतें. ऑस्ट्रेलिआंतील एका कारखा-न्याच्या तांत्रिक साह्यानें हा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना उत्पादन करूं लागल्यावर दरसाल २,४०० पवनचक्क्या तयार होतील. पवनचक्क्यांच्या साह्यानें उत्पादन करण्यांत येणारी वीज स्वस्त पडते, असें तज्ज्ञांचें मत आहे.

## अणुशक्तीच्या उपयोगाचें कल्पनारम्य चित्र

१९५३ च्या डिसेंबरमध्यें अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं अणुशक्तीचा शांततामय उपयोग करण्याची योजना जाहिर केली. तेव्हांपासून अणुशक्तीचा मनुष्याच्या कल्याणासाठीं उपयोग कसा करावा ह्यासंबंधीं बरीच चर्चा चालू झाली. ह्या विषयासंबंधीं रशिआच्या प्रमुख शास्त्रीय संस्थेंतील एका शास्त्रज्ञानें एक कल्पनारम्य चित्र रेखाटलें आहे. उत्तर ध्रुवाचा प्रदेश हा अतिशय थंडीमुळें मनुष्याला रहाण्यासारखा नाहीं. तथापि, हा अवाढव्य प्रदेश मनुष्यवस्तीस योग्य करणें शक्य असल्याचा दावा वरील शास्त्रज्ञानें केला आहे. अणुशक्तीविषयक इंजिनि-अरिंगची मदत घेऊन पृथ्वीवरील भौगोलिक परिस्थिति कशी बदलता येईल ह्याचा विचार रशिअन शास्त्रज्ञ करूं लागले आहेत. रशिआचें ईशान्य टोंक व अमेरिकेचा अलास्का ह्या दोन प्रदेशांना जोडणारी बेरिंगची सामुद्रधुनि प्रसिद्धच आहे. ह्या सामुद्रधुनीवर मोठें धरण बांधून प्रथम पॅसिफिक महासागर आणि उत्तरध्रुवाचा समुद्र ह्यांचा संबंध तोडून टाकावयाचा व नंतर अणुशक्तीच्या साह्यानें निर्माण केलेल्या विजेचा उपयोग करून हजारों पंप चालवावयाचे, पंपांच्या साह्यानें पॅसिफिक महासागरांतील ऊष्ण पाणी उत्तर-ध्रुवाच्या सागरांत सोडून त्या सागरांत गल्फ स्ट्रीम इतका उष्णतामानाचा प्रवाह सुरू होईल अशी व्यवस्था करावयाची अशी ही अवाढव्य योजना आहे. ह्या कामासाठी २० लाख किलोवॅट वीज निर्माण करणारें केंद्र बांधावें लागेल असा रशिअन शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. उत्तरध्रुवाचा अतिशय थंड प्रदेश अशा रीतीनें माणसाला उपयोगी असा करतां येईल आणि ह्या प्रचंड योजनेनें रशिआप्रमाणें उत्तर अमेरिका व युरोप ह्यांचाहि फायदा होईल, असें त्यांचें मत आहे.

**घरें बांधण्यासाठीं रक्कम**—पुणें, मुंबई व अहमदाबाद येथील म्युनिसिपल नोकरांना रहाण्यासाठी व कमी उत्पादनाच्या लोकांना राहाण्याच्या जागा पुरविण्यासाठीं मुंबई सरकारनें ३६ लाख रुपयांची रक्कम राखून ठेवली आहे असें समजतें. जमिनी-सकट २८०० रुपयांत गाळे बांधण्याच्या योजना सरकारनें कॉर्पोरेशन्सकडून मागविल्या होत्या.

## सारस्वत को. बँकेची वैशिष्ट्यपूर्ण प्रगति

### लहान कर्जदारांकडे लक्ष : वक्तशीर परतफेडीस उत्तेजन

सारस्वत को. बँक लि. च्या प्रगतीची गति चालूच आहे. अहवालाचे वर्षी तिचेकडील ठेवींत १० लक्ष रुपयांची भर पडून त्यांची रक्कम १,३८,२८,९१३ रु. झाली. येणें कर्ज ४४·९७ लक्ष रु. आहे. म्हणजे दोन्हींतील प्रमाण १०० : ३२·६ असें सुरक्षित मर्यादेंत आहे. शेअर भांडवल ७·३६ लक्ष रु. व रिझर्व्ह आणि इतर फंड ६·४६ लक्ष रु., म्हणजे बँकेच्या मालकीचें भांडवल १३·८२ लक्ष रुपयांचें आहे. रोख्यांतील गुंतवणूक ८८ लाखांची आहे. आपल्या सभासदांना व इतरांना नव्या सरकारी रोख्यांत रकमा गुंतविणें सोपें जावें, म्हणून "मुंबई राज्य विकास बचत-योजना" आखली व त्या योजनेचा फायदा रजिस्ट्रारची मंजुरी घेऊन सभासदेतरांनाहि देण्यांत आला. वैयक्तिक व इतर तारणावरील कर्जफेड नियमितपणें करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून, वक्तशीर कर्जाचे हप्ते भरणारांना व्याजांत सूट दिली जाते. ही सूट २ टक्क्यांवरून ३ टके करण्यांत आली आहे. म्हणजे, कर्जदारांना फक्त २% एवढाच व्याजाचा दर पडतो. १००० रु. पर्यंतच्या, आजारीपण, शिक्षण, इत्यादि घरगुती अडचणींसाठी घेतलेल्या कर्जास ही सवलत मिळते. वक्तशीर परतफेडीच्या हितकारक संवयीस त्यामुळें चांगलें प्रोत्साहन मिळतें; इतर बँकांनीं सारस्वत बँकेचें, इतर अनेक बाबींप्रमाणें ह्याहि बाबतींत अवश्य अनुकरण करावें. अहवालाचे वर्षी बँकेनें दिलेल्या ७६२ कर्जांपैकी ६४६ कर्जे ५,००० रुपयांखालचीं होतीं, ह्यावरून लहान कर्जदारांच्या गरजेकडे संचालकांचें विशेष लक्ष आहे हें दिसून येतें. अहवालाचे वर्षी बँकेस ८५,०७८ रु. नफा झाला. भागीदारांना ६¼% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. फोर्ट (मुंबई) विभागांत हमाम स्ट्रीटवर २३ जून, १९५५ रोजीं बँकेनें शाखा उघडली असून तिला समाधानकारक सहकार्य मिळत आहे. श्री. व्ही. पी. वर्दे हे बँकेचे चेअरमन असून श्री. जी. एम. लाड हे व्हाइस चेअरमन आहेत. श्री. एस. व्ही. संझगिरी हे संचालक–चिटणीस आहेत.

---

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि., जळगांव

वरील बँकेच्या १३ शाखा व १४ उपशाखा आहेत. त्यांत चालू वर्षी दोहोंची भर पडणार आहे. वसूल भांडवल ३० हजारांनीं वाढून तें १६,०३,४०० रु. झालें आहे. ठेवींत २९ लाखांची वाढ होऊन, त्यांची रक्कम २,१२,६२,०६५ रु. झाली आहे. जिल्ह्यांतील ९६·२% खेडीं व ५६·८% पतवान शेतकरी सहकारी चळवळींत समाविष्ट आहेत. येणें कर्ज १,१६,४५,१२२ रु. आहे. रिझर्व्ह बँकेनें ह्या बँकेला सवलतीच्या दरानें कर्जासाठी ५० लक्ष रु. मंजूर केलेले आहेत. गोरवाला समितीच्या शिफारसी-प्रमाणें प्रयोग करून पहाण्यासाठी मुंबई सरकारनें तीन जिल्हे निवडले आहेत. त्यांत पू. खा. हा जिल्हा आहे. त्या प्रयोगास हार्दिक मदत देण्याचें बँकेच्या चालकांनीं मान्य केलें आहे. बँकेच्या एक वगळून बाकी सर्व शाखा–उपशाखा नफ्यांत चालू आहेत, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३,०७,९०४ रु. नफा झाला. ५% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. (चेअरमन : जुलालसिंग शंकरराव पाटील. कार्यकारी संचालक : राजाराम यादवराव सोनावणे. अॅ. ऑफिसर : वामनराव दलपतराव सोळुंखे.)

## दि मराठा को–ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक, लि., बेळगांव

यंदाचे वर्षी बँकेची प्रगति कशी झाली आहे, यासंबंधींची माहिती खालील तुलनात्मक तक्त्यांत दर्शविली आहे.

| | १९५३–५४ | १९५४–५५ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| (१) सभासद | १,३३२ | १,४२२ |
| (२) शेअर भांडवल | ५६,७०० | ६०,३७५ |
| (३) रिझर्व फंडस् | ४१,८९० | ४६,५८४ |
| (४) ठेवी | ४,१५,१८० | ४.३८,१२४ |
| (५) कर्जें | २,७५,२३० | २,९०,२४४ |
| (६) इन्व्हेस्टमेंटस् | १,१८,१५५ | १,५०,२९४ |
| (७) एकूण नफा | २६,१६४ | १८,०६७ |
| (८) व्यवस्थाखर्च | ७,०५० | ८,३५० |
| (९) निव्वळ नफा | १०,०६७ | ८,५६८ |
| (१०) एकूण खेळतें भांडवल | ५,३२,३९१ | ५,६३,८४६ |

बँकेकडील ठेवी २३,००० रुपयांनीं वाढल्या आहेत. अहवालाचे सालीं बँकेनें 'संजीवनी दैनिक ठेव' योजना सुरू केली आहे. पहिल्या दोन महिन्यांच्या अवधींतच सुमारें २०० ठेवीदार बांधवांनीं तिचा फायदा घेण्यास प्रारंभ केला आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ८,५६८ रु. नफा होऊन भागीदारांना ५% डिव्हिडंड देण्यांत आलें. (चेअरमन : गजानन महादेवराव भातकांडे. सेक्रेटरी : ए. के. सोमणाचे, डी. कॉप.)

---

## भारताचा परराष्ट्रीय व्यापार

(आकडे कोटी रुपयांचे)

| वर्ष | आयात | निर्गत | देण्याघेण्यांतील तफावत |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (२) | (४) |
| १९३९–४० | १६४·७५ | २१३·५७ | +४८·८२ |
| १९४३–४४ | ११७·६८ | २०९·९९ | +९२·३१ |
| १९४६–४७ | २८८·४४ | ३१९·२८ | +३०·८४ |
| १९४७–४८ | ३९८·६२ | ४०३·१९ | +४·५७ |
| १९४८–४९ | ५१८·०० | ४२२·८२ | –९५·१८ |
| १९४९–५० | ५५३·०० | ४६३·३४ | –८९·६६ |
| १९५०–५१ | ५४८·५३ | ५७९·८४ | +३१·३१ |
| १९५१–५२ | ८५२·९३ | ७००·५६ | –१५२·३७ |
| १९५२–५३ | ६७०·१४ | ५७८·०७ | –९२·०७ |
| १९५३–५४ | ५७२·१३ | ५३०·६६ | –४१·४७ |
| १९५४–५५ | ६३४·०४ | ५८३·५१ | –५०·५३ |

---

## रिझर्व्ह बँकेचा लायसेन्स

रिझर्व्ह बँकेनें बेळगांव बँक लि. व बँक ऑफ महाराष्ट्र लि. ला लायसेन्स दिला आहे, असें समजतें. १९५४ अखेर ३४ बँकांना असें लायसेन्स मिळालेले होते, व ४९० बँकांचे अर्ज लायसेन्ससाठी विचारांत होते.

---

**पूर्व–जर्मनींतील रेड क्रॉसची मदत**—भारतामधील पूरग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी पूर्वजर्मनींतील रेडक्रॉसनें ६,३८,००० रुपयांचीं औषधें व इतर वैद्यकीय मदत भारतीय रेडक्रॉसच्या हवाली केली आहे. हंगेरिअन रेडक्रॉसतर्फेंहि २४,००० रुपयांचीं औषधें मिळालीं आहेत.

# दुसरी पंचवार्षिक योजना

## ( ३ )

### राष्ट्रीय योजनेचा खर्च

१४. देशाच्या किमान गरजांशीं जुळत्या प्रमाणांत विकासाची गति राहण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध करण्याकरितां अतिशय प्रचंड प्रमाणावर प्रयत्न करावे लागतील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी आंखलेल्या कच्च्या मसुद्यांत एकूण ५६०० कोटी रुपये खर्चाी पडतील असें धरलेलें असून त्यांपैकी ३४०० कोटी रु. सरकारी क्षेत्रांत खर्च होतील. राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढीबाबतचीं आणि नोकरीच्या संधींतील वाढीबाबतचीं योजनेच्या आराखड्यांत मांडलेलीं उद्दिष्टें राष्ट्रीय विकासमंडळानें मान्य केलीं आहेत. या आराखड्यांत भांडवल गुंतवणूक व चालू खर्च यासुद्धां सरकारी क्षेत्रांत पुढीलप्रमाणें रक्कम खर्च करण्यांत यावी असें संकल्पिलेलें आहे :—

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | |
|---|---|
| वीज | ४५० |
| शेती, पाटबंधारे व ग्रामीण विकास | ९५० |
| उद्योगधंदे व खनिजें | ११०० |
| वाहतूक व दळणवळण | ९५० |
| बांधकामें, सामाजिक सुखसोयी व माल | ८५० |

निरनिराळ्या क्षेत्रांत करावयाच्या प्रत्यक्ष लक्ष्यांचे योजनेच्या आराखड्यांत दिलेले आंकडे अर्थातच प्राथमिक स्वरूपाचे होते. अधिक तपासणी करतां, वाहतूक व दळणवळण यांसाठी त्यामानानें वरीच अधिक रक्कम देण्याचा आणि उद्योगधंद्यांतील गुंतवणुकींत कांहींशी कपात करण्याच्या शक्याशक्यतेबरोबरच सामाजिक सुखसोयींवर थोडा अधिक खर्च करण्याची गरज दिसून आली. निरनिराळ्या गटांसाठी पैशाची वांटणी करण्याबाबतचें तपशीलवार काम आतां हातीं घेण्यांत आलें आहे. मध्यवर्ती, तसेंच राज्य सरकारें मिळून एकूण सरकारी क्षेत्रांत हातीं घ्यावयाच्या विकासयोजनांच्या खर्चासुद्धां राष्ट्रीय योजनेचा खर्च म्हणून ४३०० कोटी रु. या रकमेस राष्ट्रीय विकासमंडळानें मान्यता दिली आहे. ही रक्कम विचारांत घेऊन योजनांची आतां तपशीलवार छाननी करण्यांत येत असून साध्य करावयाचे आंकडे नव्यानें अंदाजिण्यांत येत आहेत.

### ध्येय प्राप्तींतील उणीवा

१५. प्रत्यक्ष साध्य करावयाच्या गोष्टींची अधिक कसून तपासणी करतां असें वाटतें कीं, संकल्पित कार्यक्रमांतून राष्ट्रीय उत्पन्नांत प्रतिवर्षी ५ टक्क्यांहूनहि कमी वाढ आणि पूर्वी अपेक्षिलेल्या ११० ते १२० लक्ष नोकऱ्यांहूनहि बऱ्याच कमी प्रमाणांत रोजगारीच्या संधी उपलब्ध होतील. कार्यक्रमांची तपासणी जसजशी होत जाईल तसतशी ही उणीव किती मर्यादेपर्यंत येईल तें स्पष्ट होईल. तथापि, पुढील योजनेसाठी राष्ट्रीय उत्पन्न किंवा रोजगाराचें प्रमाण यामध्यें वाढ करण्याचीं लक्ष्यें पूर्वी अंदाजिलेल्यापेक्षा कमी प्रमाणांत पुढें ठेवणें ही गोष्ट समाधानकारक ठरणार नाहीं, आणि या संभवामुळें निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे पुढील कांहीं महिने अधिक लक्ष दिलें जाईल हें निःसंशय.

### रकमेची उभारणी

१६. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक साधनसंपत्तीच्या प्रश्नावरहि काळजीपूर्वक विचार चालू आहे. कांहीं प्रमाणांत जादा करवाढ, अल्प बचती व कर्जें, कांहीं प्रमाणांत परकीय मदत, तसेंच सुमारें १,००० कोटी रुपयांपर्यंत तुटीचा अर्थसंकल्प करूनहि आपणांस संकल्पित ४३०० कोटी रुपये उभारण्यास सुमारें ८०० कोटी रु. कमी पडतील अशी स्थिति आहे. अधिक करवाढीनें ही तूट भरून काढण्यांत येईल असें योजनेच्या आराखड्यांत संकल्पिलेलें होतें. सध्यां आपला महसूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारें ७ टक्के एवढा आहे. पाहिजे असणारी ८०० कोटी रु. रक्कम मिळविण्यासाठीं हें प्रमाण ७ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढवावें लागेल.

### करवाढ अपरिहार्य

१७. म्हणजे, आतां मान्य करण्यांत आलेल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अगदीं बेतशीर आर्थिक लक्ष्याच्या परिपूर्तीसाठी देखील राष्ट्रीय प्रमाणावर फार मोठा प्रयत्न करावा लागणार आहे. हा प्रश्न आतांच विचारांत घेऊन पुढील योजना अंमलांत आणण्यापूर्वीच राजकीय दृष्ट्या व अन्य प्रकारें हें आव्हान स्वीकारण्याची तयारी करणें हा सर्वोत्तम मार्ग आहे. यासाठी देशानें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर कराचें ओझें घेण्यास सिद्ध असलें पाहिजे. तसेंच विकासयोजनांचा लाभ मिळणारीं क्षेत्रें व लोकसंस्थेचे विभाग यांतून जादा उत्पन्नांतील कांहीं भाग नव्या भांडवलांत वाढत्या प्रमाणावर मिळण्याची खबरदारी देण्यांत यावी.

### नियंत्रणासाठी सिद्धता

१८. ४३०० कोटी रुपये भांडवलाचा कार्यक्रम हातीं घेण्यांत कांहीं धोके आहेत, ही गोष्ट मान्य केली पाहिजे. जनतेवर प्रत्यक्षपणें परिणाम करणारीं नियंत्रणें ठेवावीं अशी आपली इच्छा नसली तरी अशी परिस्थिति एखादे वेळीं उद्भवेल कीं ज्यावेळीं विकासकार्य आणि चलनवाढीस आळा घालणारीं नियंत्रणें यांतील एका पर्यायाचा स्वीकार आपणांस करावा लागेल. अशा परिस्थितींत नियोजनासाठी नियंत्रणें आवश्यक मानण्यास आपण सिद्ध असलें पाहिजे.

### उत्पन्नाचीं साधनें वांटण्यांतील उपक्रम

१९. मध्यवर्ती सरकारचीं निरनिराळीं खातीं आणि राज्य सरकारें यांनीं आंखलेल्या प्राथमिक योजनांमुळें ९,००० ते १०,००० कोटी रु. जादा उभारावे लागतील. ही रक्कम जवळ जवळ निम्म्यानें तरी कमी करावी लागेल. तसेंच पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सुरू झालेल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत चालू राहिलेल्या योजनांवरील खर्चास प्राधान्य द्यावें लागेल.

२०. पहिल्या पंचवार्षिक योजनेपेक्षा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें स्वरूप निराळें दिसण्याचें कारण म्हणजे या योजनेंत उद्योगधंद्यांवर देण्यांत येणारा अधिक भर. उद्योगधंद्यांसाठी मिळू शकणाऱ्या पैशांतील बराचसा भाग पोलाद निर्मितीच्या तीन योजना, सरकारी क्षेत्रांतील कोळशाच्या उत्पादनाचा विकास, अवजड विद्युतयंत्रसामुग्रीचा कारखाना व सध्यां विचारांत असलेल्या आणखी कांहीं योजना यांवर खर्च होईल. या योजनांसाठी आवश्यक अशा वाहतुकीच्या गरजा, सध्यां विचारांत असलेल्या पाटबंधारे व विद्युतयोजना आणि शेतकी व औद्योगिक उत्पन्नांत सर्वसाधारण वाढ यांसाठी होणारा खर्च वगळतां, वाहतुक आणि दळणवळणावर विशेषतः रेल्वेवर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उपलब्ध होणाऱ्या पैशांचा बराच भाग खर्च होईल.

२१. अशा रीतीनें उद्योगधंदे, वाहतुक व विद्युत् यांसारख्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें आखावयाच्या योजनांच्या विकासा- लहान क- खर्चाचा उपक्रम आणि शेतकी, पाटबंधारे, रस्ते व समाज स्वा-थाण योजना यांसारख्या जनतेच्या जीवनावर व कल्याणावर अह तावडतोब परिणाम घडवून आणणाऱ्या योजनांवरील खर्चाचा त्यांचा पक्रम यांतील सुवर्णमध्य साधणें आवश्यक आहे. तसेंच सबंध शे लक्ष रु. अंचा व प्रत्येक राज्याचा विचार करतां, आर्थिक विकासा- भ मर्यादेंत जो दिलेली साधनसामुग्री व शिक्षण, आरोग्य आणि घरबांधणी त इतर यांसारख्या समाजसेवेच्या कार्यासाठी दिलेली साधनसामुग्री या दोघांत समतोलपणा साधण्याची जरूरी आहे. या सर्वच क्षेत्रांत बऱ्याच उणीवा भरून काढल्या पाहिजेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अग्रहक्क निश्चित करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती म्हणजे त्यामानानें कमी विकसित असलेल्या किंवा झपाट्यानें प्रगति साधण्याच्या कामीं ज्यांचे खास आर्थिक प्रश्न समोर उभे राहतात असे जे देशांतील विभाग आणि कांहीं गट आहेत, त्यांना साह्य करण्यासंबंधीची आहे.

### समतोलपणाचें महत्त्व

२२. अशा रीतीनें नियोजनाचा तपशील तयार करीत असतांना विकासाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील अग्रहक्क ठरविण्याचें काम म्हणजे प्रत्येक विभागांतील परिस्थिति, आतांपर्यंत साधलेल्या विकासाची पातळी व देशाच्या निरनिराळ्या विभागांच्या तांतडीच्या गरजा या गोष्टी विचारांत घेऊन तौलनिक दृष्ट्या केलेले फेरफार होत. मूलभूत आणि इतर उद्योगधंद्यांची उभारणी करण्यावर विशेष व वाढत्या स्वरूपाचा भर दिला पाहिजे त्यांत शंकाच नाहीं. तथापि, त्याचवेळीं एका बाजूस दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या आर्थिक विकासामध्यें आणि दुसऱ्या बाजूस आर्थिक विकासांत आणि समाजसेवेच्या कार्याच्या विकासांत सर्वमान्य असा समतोलपणा साधण्याची आवश्यकता राहील. देशाच्या निरनिराळ्या प्रदेशामध्येंहि असा समतोलपणा साधण्याची गरज आहे. कारण, तसें झालें तरच विकासामुळें होणाऱ्या लाभांत, निर्माण केलेल्या समाजसेवेच्या कार्यांत आणि नियोजनामुळें होणाऱ्या उत्पन्नाच्या वाढींत सर्व जनतेला योग्य तो वांटा मिळूं शकेल.

२३. अविकसित राष्ट्रांत बराच पैसा मूलभूत स्वरूपाच्या उत्पादक सामुग्रीच्या उभारणीसाठी व प्राथमिक स्वरूपाच्या सोयी करण्यासाठी वापरावा लागतो. यामुळेंच, विशेषत्वें बेकारीच्या आणि अपुऱ्या रोजगारीच्या प्रश्नांची त्वरित उकल होण्याच्या दृष्टीनें योग्य अशी आर्थिक विकासाची योजना आंखण्याचें काम सोपें नव्हे. ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे यामुळें नव्या रोजगाराचें प्रमाण बरेंच वाढावें या मुद्यावर सर्वांचें एकमत आहे. या उद्योगधंद्यांतून समाजास लागणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंची बहुतेक सर्व गरज भागूं शकेल, इतपत त्यांची वाढ झाली पाहिजे आणि म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या उद्योगधंद्यांना विशेष महत्त्व आहे.

---

**बंगलोर येथील रेडिओ स्टेशन**—बंगलोर येथें नव्यानें सुरू करण्यांत येणारें ऑल इंडिआ रेडिओचें केंद्र १ नोव्हेंबर- पासून कार्यक्रम सुरू करील असा अंदाज आहे. ह्या केंद्रांत ५० किलोवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक बसविण्यांत येणार आहे. म्हैसूर ध्वनिक्षेपण-केंद्र बंद करण्यांत येत असलें तरी तेथील स्टुडिओ कायम ठेवण्यांत येईल.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचें उद्योगधंद्यांना साहाय्य

(१) गेल्या १० वर्षांत इं. फि. कॉर्पोरेशननें नव्या (१५ ऑगस्ट, १९४७ नंतर उत्पादन करूं लागलेल्या) उद्योग- धंद्यांना एकूण १५,२२,५०,००० रु. चीं कर्जें मंजूर केलीं आहेत. ह्याच मुदतींत, जुन्या कारखान्यांना १२,८५,२५,००० रु. चीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं.

(२) कॉर्पोरेशननें, अशा रीतीनें आजवर मंजूर केलेल्या सुमारें २८ कोटी रुपयांच्या कर्जांपैकी प्रत्यक्ष १४·५ कोटी रुपये अदा करण्यांत आलेले आहेत.

(३) एकूण अर्जदार–कारखान्यांची संख्या १२५ आहे.

(४) ३० जून, १९५५ अखेरच्या वर्षी कॉर्पोरेशननें ७,३४,००,००० रु. चीं कर्जें मंजूर केलीं. एकूण ११,२७,००,००० रु. च्या कर्जांसाठी अर्ज आले होते.

(५) गेल्या वर्षी आसाम, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्तान आणि मध्यभारत अशा आणखी पांच राज्यांत स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन्सची स्थापना झाली. त्यांना इं. फि. कॉर्पोरेशननें साहाय्य देऊन मार्गदर्शन केलें.

(६) १० लाखांपर्यंतचे अर्ज स्टेट फि. कॉर्पोरेशननें विचारांत घ्यावे आणि त्यापेक्षा मोठ्या कर्जांचे अर्ज इं. फि. कॉर्पोरेशननें विचारांत घ्यावें, असें ठरविण्यांत आलें आहे.

(७) कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून आतांपर्यंत १,९०,००,००० रु. व्याज जमा झालें आहे. येणें मुद्दल १,५१,५१,००० रु. असून त्यापैकी १,०८,०४,००० रु. परतफेड झालें आहे.

(८) इं. फि. कॉर्पोरेशनला अहवालाचे वर्षी २४ लक्ष, ७० हजार रु. ठोक नफा झाला. ह्यापूर्वी कोणत्याहि वर्षी एवढा मोठा नफा झाला नव्हता. संशयित कर्जांच्या तरतुदीसाठी १५ लक्ष रु. रिझर्व्ह फंडांत टाकणें डायरेक्टरांना आवश्यक वाटलें. म्हणजे, एकूण तरतूद २० लक्ष रु. झाली आहे. सोदपूर ग्लास वर्क्सच्या एकट्या व्यवहारांतच ५० लाखांचा तोटा अपेक्षित आहे.

(९) सरकारकडून ११,२५,००० रु. घेऊनच कॉर्पोरेशन डिव्हिडंड देऊं शकली. डिव्हिडंडला लागणारी सर्वच्या सर्व रक्कम सरकारकडूनच घ्यावी लागली; नफ्यांतून ह्याची कांहींहि तरतूद होऊं शकली नाहीं. १९५३–५४ मध्यें सरकारचे ४,८६,३६२ रु. पुरले होते; बाकीची रक्कम नफ्यांतून भागविता आली होती.

---

**पहिल्या पंचवार्षिक योजनेचा खर्च**—पहिल्या पंचवार्षिक योजनेंत जितका खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें होतें त्यापेक्षा २८१ कोटी रुपये कमी खर्च होतील असा अंदाज लोकसभेंत सरकारतर्फे व्यक्त करण्यांत आला. योजनेंतील कांहीं भागांचें स्वरूप दुसऱ्या अगर तिसऱ्या वर्षांत निश्चित करण्यांत आल्या- मुळें असें झालें म्हणून खुलासाहि करण्यांत आला.

**रशिआंतील अणुविषयक संशोधन**—भारताचे अणुशास्त्रज्ञ डॉ. भाभा रशिआचा दौरा करून ब्रिटनला परतले आहेत. रशिआंतील अणुविषयक संशोधन अमेरिकेच्या तोडीचें आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें. तथापि रशिआंतील अणुशास्त्रज्ञांची संख्या अमेरिकेंतील अणुशास्त्रज्ञांपेक्षा अधिक आहे असें त्यांनीं सांगितलें.

## लँडमॉर्गेज बँकांपुढील प्रश्न

( श्री. नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी, चेअरमन, सातारा जिल्हा को. लँडमॉर्गेज बँक लि., कराड सांगली. )

या संस्थेच्या विसाव्या साधारण सभेस आपलीं महत्त्वाचीं कामें बाजूस सारून आपण येथें आलांत यावद्दल मजला आनंद वाटत आहे. या प्रसंगीं आपणां सर्वांचें मी अंतःकरणपूर्वक स्वागत करून आजच्या सभेचे कामकाजास सुरवात होणेपूर्वी माझे कांहीं अल्पसे विचार मांडल्यास ते अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. शेतकरी बांधवांच्या व संस्थेच्या दृष्टीनें माझे विचार आपल्यास स्वागतार्हच वाटतील अशी उमेद आहे.

गतसालचा अहवाल आतांपर्यंत आपणां सर्वांच्या हातीं पडलेला असेलच व आपण सर्वांनीं वाचूनहि पाहिला असेल. अहवालावरून बँकेनें केलेल्या कामकाजाची व सांपत्तिक परिस्थितीची आपणांस पूर्ण कल्पना आली असेलच. गेल्या ५–६ वर्षांपासून ३ वर्षे बँकेस नुकसान होऊन हा आकडा सहा हजारांचे वर गेलेला होता, अर्थात् थकबाकी, भांडवलाचा अभाव इत्यादि जरी अनेक कारणें असलीं तरी १९५० पासून सांगलीस सहकारी खात्याच्या प्रोत्साहनानें उघडण्यांत आलेल्या शाखा ऑफिसामुळेंच हें नुकसान झालें असें म्हण्यास मुळींच हरकत नाहीं. परंतु दक्षिण भागांतील शेतकरी बांधवांच्या सोयीपुढें जरी संस्थेस झीज सोसावी लागली तरी तें सहन करणें प्राप्त कर्तव्यच होतें. दरसाल दोन चार हजारांच्या फायद्यापेक्षा शेतकऱ्यांच्या हिताकडेच जास्त लक्ष पुरावणें हा सहकारी चळवळीचा मुख्य उद्देश होय. आतां याहि परिस्थितींतून आपली संस्था पार पडलेली असून इतःपर या संस्थेचें भवितव्य उज्ज्वल आहे असें अभिमानानें म्हणावेंसें वाटतें.

मुंबई राज्यांतील एकूण १९ बँकेमध्यें ४–५ बँकाच चांगल्या सुस्थितींत असून त्यांचा व्यवहार झपाट्यानें वाढत आहे असें दिसून येतें. ५०,००० ते २,००,००० पर्यंत व्यवहार असलेल्या आठ लॅन्डमॉर्गेज बँका, २ ते ५ लाखांपर्यंत व्यवहार असलेल्या ५ बँका आणि ५ ते १० लाखापर्यंत व्यवहार असलेल्या ४ बँका आहेत. १५ लाखांवर व्यवहार केलेली बँक एकच आहे. २० वर्षांच्या इतिहासानंतर देखील ज्यांचा व्यवहार २ लाखांचे पुढें जाऊं शकला नाहीं अशा वर्गामध्यें ८ बँका असल्यामुळें भूतारण संस्थेच्या चळवळीस व्हावी तितकी जोरकसपणें मदत होऊन उठाव होत नाहीं असेंच म्हणावें लागतें. अर्थात् यांस कांहीं कारणेंहि आहेत. पण त्याहि परिस्थितींतून चिकाटीनें व्यवहार वाढवितां आले असते. कर्ज निवारण कायदा, तुकडबंदी कायदा, निर्वासित कायदा वगैरे अनेक प्रकारचे कायदे लोकहितार्थ सरकारकडून होत आहेत आणि त्यांचे परिणाम बँकांच्या व्यवहारांवर झालेले आहेत. तसेंच वरिष्ठ बँकेच्या वेळोवेळीं व प्रसंगानुरूप बदलत्या धोरणामुळें बराचसा परिणाम होऊन कार्यकर्त्यांची नाउमेद झालेली असेल, आणि म्हणूनच या लांब मुदतीच्या कर्जाकडे जितकें लोकांचें लक्ष लागावें तितकें तें लागत नाहीं.

रिझर्व्ह बँकेनें जिल्हानिहाय लँडमॉर्गेज बँका याच लांब मुदतीच्या कर्जाचा व्यवहार करण्यास योग्य, प्रमुख व जिव्हाळ्याच्या संस्था आहेत—हें तत्त्व मान्य करून, वरिष्ठ बँकेनें या बँकेचे व्यवहार वाढविणेकरतां कामकाजांत उपस्थितींत होणाऱ्या अनेक प्रश्नांचा विचार करून, जिल्हा बँकांचा विश्वास व ऋणानुबंध जेणेंकरून इतःपर ज्यास्त जिव्हाळ्याचे होतील इकडे लक्ष देणेबद्दल सूचना केलेल्या आहेत. त्याचप्रमाणें सरकारलाहि लँडमॉर्गेज बँकांचें योग्य तें मार्गदर्शन व देखरेखीकरतां जरूर तो नोकरवर्ग देऊन लांब मुदतीचे व्यवहाराच्या प्रगतीसाठी जी कांहीं मदत द्यावी लागेल तीहि पुरवणेबद्दल त्यांनीं सरकारांस विनंती केली आहे. रिझर्व्ह बँकेचा समग्र अहवाल पाहतां बँकेच्या अधिकाऱ्यांनीं वस्तुस्थिति पाहून परिश्रमपूर्वक मेहनत करून आपला अहवाल दिलेला आहे. लँडमॉर्गेज बँकांची चळवळ १९२८ पासून आपल्या प्रांतांत सुरू झाली, म्हणजे आज सुमारें २७ वर्षे झालीं. तरी ३ बँकांच्या १९ बँकाच होऊं शकल्या आणि त्यांत १३ बँकांचे व्यवहार ५ लाखांवर गेले नाहींत—हें पाहून एक प्रकारचा मनास विशाद वाटल्याशिवाय रहात नाहीं. तेव्हां लांब मुदतीच्या कर्जाची सहकारी चळवळ झपाट्यानें वाढणेस व राज्यांतील सर्वच बँकांची सुधारणा होणेस रिझर्व्ह बँकेच्या सूचनांचा जरूर अम्मल व्हावा अशी आपण आपल्या सरकारास विनंति करूं या.

मुंबई असेंब्लीच्या चालू बैठकीपुढें मुंबई कूळकायद्यांत अमेंडमेंट बिल नं. ३४ अन्वयें वरीचशी दुरुस्ती सुचविण्यांत आलेली आहे. पूर्वीच्या कूळकाद्यांत क. नं. ८८ खाली सहकारी पतःपढींच्या व्यवहारास पूर्णपणें संरक्षण दिलेलें होतें. अर्थात् अशा प्रकारचें संरक्षण दिलें जाणार आहे किंवा नाहीं याची खात्री नसल्यानें सर्वच व्यवहार गुंतागुंतीचे व धोक्याचे होणार आहेत अशी साधार भीति वाटल्यावरून तूर्त संस्थेच्या हिताच्या दृष्टीनें व्यवहार स्थगित करण्यांत आलेले आहेत.

पुढील वर्षापासून दुसरी पंचवार्षिक योजना सुरू होणार असून त्यांत लॅन्डमॉर्गेज बँकांच्या व्यवहाराकरितां बऱ्याचशा योजना आखण्यांत आलेल्या आहेत, व रिझर्व्ह बँकेकडून जरूर तें साहाय्यहि मिळणार आहे. त्याचप्रमाणें,आपल्या मुंबई सरकारकडून ज्या त्या सोसायटीचें जितकें शेअर भांडवल असेल त्याच्या ५०% रक्कम सरकारकडून शेअर भांडवल म्हणून दिली जाणार आहे. अर्थात् आपल्याहि बँकेस योग्य त्या प्रमाणांत हें भांडवल मिळेलच पण त्याचबरोबर सरकारी नियंत्रणाहि कांहीं अंशीं जास्त प्रमाणांत वाढण्याचा संभव आहे. अर्थात् सरकारच्या नियंत्रणाबद्दल निदान भूतारण संस्थांना तरी भिण्याचें कांहीं कारण आहे असें दिसत नाहीं. तांत्रिकदृष्ट्या कां होईना, पण कर्जदारांचें व्याज मुदलास सरकारची हमी असल्यानें भांडवल उभारूं शकतें; याशिवाय शेतकऱ्यांना जमीन सुधारणा, विहीर, इंजन इत्यादि करतां तगाईकर्जाप्रमाणें व्याजाचे दर असावेत म्हणून जे कांहीं या बाबतींत नुकसान होईल तेंहि सरकारकडून देण्यांत येतें. तसेंच दस्तऐवजाचा खर्च, शोधनावळ फी वगैरे अनेक बाबतींत ही चळवळ वाढविण्याच्या दृष्टीनें मदत सरकारनें दिली आहे. त्यामुळें या संस्था जवळ जवळ सरकारीच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र मजला या ठिकाणीं मुद्दाम नमूद करावें असें वाटतें तें हें कीं, विहीर, इंजिन इत्यादि करतां शेतकऱ्यांचे पदरीं कर्ज कमी व्याजानें पडावें म्हणून जी मदत केली जाते त्या आधारावर लॅन्डमॉर्गेज बँकांना अंतर्गत व्यवहाराबद्दल अगर लॅन्ड व्हॅल्युएशन ऑफिसरबाबत मदत मागितल्यास ती वरील सबबीवर नाकारण्यांत येते. इतकेंच नव्हे पण शाखा ऑफीसकरतां मदत मागितली असतां तीहि नाकारण्यांत आलेली आहे. बॉम्बे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेनें अगर सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेनें एखादी शाखा जरी काढल्यास त्यांना मात्र पहिलीं तीन वर्षे त्या शाखेकरतां जें नुकसान होईल तें सरकारकडून सोसण्यांत येतें. तेव्हां या संस्थाप्रमाणें लॅन्डमॉर्गेज बँकेस

जरूर त्याबाबत मदत देण्यांत यावी एवढीच सरकारास विनंती करावीशी वाटते.

शेतमालावरील भाव लढाईनंतर कांहीं काल तेजींत होते पण आतां काल बदलत आहे. शेंग, गूळ, तंबाखू, कापूस, ज्वारी, बाजरी, मिरची, इत्यादींचे सर्वच भाव उतरले आहेत आणि उतरत आहेत. याची कल्पना बँकेच्या वाढत्या थकबाकीवरूनच सिद्ध होत आहे. तेव्हां शेतकऱ्यांनीं चालू भारी व्याजानें भरमसाठ कर्ज काढून भांडवलाची गुंतवणूक करावी किंवा काय याचा विचार होणें अत्यंत जरूरीचें आहे. सर्वच योजना शेतकऱ्यांच्या फायद्याच्या होतील याची खात्री नसते. लागवडी भांडवल म्हणून जें अल्प मुदतीचें कर्ज स्टेटबँकेकडून दिलें जातें तें रिझर्व्ह बँकेकडून १३% नी व्याजानीं मिळतें. त्याप्रमाणें विहीर, इंजिन इत्यादि करतां मध्यम मुदतीचे कर्जास तोच दर आहे. परंतु लँड-मॉर्गेज बँकेला मात्र या दरानें कर्ज मिळत नाहीं. फक्त विक्रीस काढलेल्या कर्जरोख्यापैकीं २० टक्के कर्जरोखे घेतले जातात. त्यामुळें इतरांप्रमाणें त्यांनाहि ४३% व्याज मिळतें. अल्प मुदतीचें कर्ज काय किंवा लांब मुदतीचें कर्ज काय, सर्व कर्जास तारण जमीनच असते. तेव्हां लांब मुदतीचे कर्जावर देखील वरील प्रमाणें सवलतीचे व्याजाचे दर असणें संयुक्तिक होईल. कदाचित् सर्वच कर्जास हा दर देतां येत नसला तरी भांडवलापैकीं कांहीं भांडवल वरील दरानें वरिष्ठ बँकेस तूर्त प्रयोगादाखल देणेचा विचार व्हावा. यामुळें शेतकऱ्यांचा फायदाच होणार आहे.

आगाऊ जमा झालेल्या वसुलांवर (ॲड्व्हान्स रिकव्हरी खात्यांवर) १९४२ पर्यंत मुंबई बँकेकडून ४३% व्याज दिलें जात होतें. परंतु १९४२ नंतर ४३% ऐवजीं ३३% प्रमाणें वरिष्ठ बँकेच्या मे. बोर्डाच्या ठरावाअन्वयें करण्यांत आला. या बाबतींत बरेचसे प्रयत्न करण्यांत आले तरी देखील त्याचा विचार अद्यापपावेतों झालेला नाहीं. मात्र नुकत्याच हातीं आलेल्या रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टावरून सभासदांकडून जितकें व्याज कर्जावर आकारलें जातें, तितकेंच व्याज त्यांनीं आगाऊ दिलेल्या रकमेवर देखील देणेंत यावें म्हणून शिफारस करणेंत आली आहे.

—वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण.

---

**अमेरिकन चित्रपटाला बंदी**—दिल्ली येथील एका सिनेमागृहांत 'टँगानीका' ह्या नांवाचा अमेरिकन बोलपट दाखविला जात होता. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनीं मनाई हुकूम काढल्यामुळें तो दाखविण्याचें बंद करण्यांत आले. आफ्रिकेंतील मूळच्या लोकांचें चित्रण करतांना ते जंगली जमात असल्यासारखे प्रसंग बोलपटांत होते.


**कण आणि क्षण**

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक : श्री. वा. काळे

| मराठी | गुजराती |
|---|---|
| दुसरी आवृत्ति | दुसरी आवृत्ति |
| पृ. सं. १६८ ★ किं. १॥ रु. | तयार होत आहे. |

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब थ. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.